**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २०१ वा | सोमवार ११ डिसेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 201 | Date : 11/12/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4

## अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी अवकाळी पावसावर होणार चर्चा




नागपूर : येथे सध्या राज्याचं हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी हिवाळी अधिवेशनावर चर्चा होणार असल्याची माहिती समोर येत आहे. उद्या म्हणजे सोमवार ११ डिसेंबर रोजी विधानसभेत अवकाळी पावसावर चर्चा होणार आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे या चर्चेचा निर्णय देणार आहेत. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या चर्चेची मागणी केली होती. त्याच प्रमाणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या मुद्द्यावर चर्चा करण्याची तयारी दाखवली होती. या चर्चासत्रामध्ये विरोधक अनेक मुद्द्यांवर सरकारला घेरण्याच्या तयारीत आहे. राज्याच्या हिवाळी अधिवेशनाचा सोमवारी तिसरा दिवस आहे. दरम्यान अधिवेशनाच्या पहिल्या दोन दिवसांमध्ये विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये घमासान झाल्याचं पाहायला मिळालं. नवाब मलिकांच्या मुद्द्यामुळे हिवाळी अधिवेशाचे पहिले दोन दिवस अत्यंत गाजले. परंतु आता अधिवशेनाच्या तिसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर चर्चा केली जाणार आहे. दरम्यान प्रश्नोत्तराच्या तासानंतर अवकाळीच्या मुद्द्यावर ही अल्पकालीन चर्चा होईल. या चर्चेमध्ये शेतकऱ्यांच्या हिताचा कोणता निर्णय घेतला जाणार हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरेल.

राज्यातील शेतकऱ्यांवर यंदाच्या वर्षात एकामागून एक संकट येतच गेली. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले त्यानंतर दुष्काळ, पुन्हा गारपीटीसह आलेला अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याच पार्श्र्वभूमीवर ७५ टक्क्यांपेक्षा अधिक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती असली तरीही अनेक भागात शासनाकडून दुष्काळ जाहीर करण्यास शासनाकडून विलंब होत असल्याचा दावा विरोधकांकडून करण्यात येत आहेत. दरम्यान या मुद्द्यावर विरोधक सत्ताधाऱ्यांना घेरण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत १ हजार २२८ महसूल मंडळात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे। **पान २ वर**

## नमो महारोजगार मेळाव्यातील नोंदणीकृत सर्व उमेदवारांच्या नोकरीसाठी शासन पाठपुरावा करणार : उपमुख्यमंत्री फडणवीस

नमो महारोजगार मेळाव्यात ११०९७ उमेदवारांना नियुक्तीपत्रे * दोन दिवसांत ६७३७८ उमेदवारांची नोंदणी ; ३२८३१ मुलाखती * महाराष्ट्रात अन्य ठिकाणीसुध्दा नमो महारोजगार मेळावे




नागपूर : आजपर्यंत देशात अनेक राज्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मात्र महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नागपूर येथे आयोजित नमो महारोजगार मेळावा हा देशात अभुतपूर्व ठरला आहे. दोन दिवसीय या मेळाव्यात ६७ हजार ३७८ उमेदवारांनी नोंदणी केली असून यापैकी ११०९७ उमेदवारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. नोंदणी झालेल्या उर्वरीत सर्व उमेदवारांच्या नोकरीसाठी शासन पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात आयोजित नमो महारोजगार मेळाव्याच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता, व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रसाद लाड, प्रवीण दटके, विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन., व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे संचालक दिगांबर दळवी, शिवानी दाणी आदी उपस्थित होते.

नागपूर येथील नमो महारोजगार मेळाव्यात उद्योग क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी सहभाह नोंदवून एक विक्रम केला आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशात सर्वाधिक रोजगार देणारा हा मेळावा ठरला आहे. यासाठी कौशल्य विकास विभागाने विशेष पुढाकार घेतला असून सर्वांच्या मेहनतीने आणि समन्वयातून हा **। पान २ वर**

## नाशिक जिल्ह्यातील कांदा लिलाव आजपासून पूर्ववत

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील कांदा लिलाव उद्यापासून पूर्ववत होणार आहे. केंद्र सरकारच्या निषेधार्थ कांदा व्यापाऱ्यांनी बेमुदत संप पुकरला होता. त्यातच पहिल्याच दिवशी म्हणजे शनिवार ९ डिसेंबर रोजी व्यापाऱ्यांमध्ये फूट पडली होती. नाशिकमधील पिंपळगाव आणि विंचूर बाजारसमितीमध्ये लिलाव सुरु होणार आहे. जे व्यापारी सलग ३ दिवस लिलाव बंद ठेवतील त्यांचे परवाना रद्द करण्याचा सहकार विभागाने इशारा दिला होता. त्याच पार्श्र्वभूमीवर कांदा लिलाव पुन्हा सुरु होणार आहेत.

केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतल्याने याचे पडसाद आता राज्यभरात उमटताना पाहायला मिळाले. १ मार्च २०२४ पर्यंत कांदा निर्यातबंदी राहणार असल्याचे परिपत्रक सरकारकडून **। पान २ वर**

## १७ महिन्यात १५६ कोटींचं अर्थसहाय्य, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा आलेख चढता



मुंबई : मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा रुग्ण सेवेचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. अवघ्या १ वर्ष ५ महिन्यांमध्ये तब्बल १५६ कोटींपर्यंत अर्थसहाय्य वाटप मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. यामुळं १९००० हून अधिक रुग्णांचे प्राण वाचल्याची माहिती मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी दिली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता मदत मिळवण्यासाठी आता मुंबईत मंत्रालयात जाण्याचीही गरज नाही. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मधून रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क असणार आहे. रुग्णांनी किंवा रुग्णांच्या नातेवाईकांनी स्वतः थेट अर्ज करावा आणि मदत मिळवावी. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळवता येतो.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता **। पान २ वर**

## सरकारला मोजत नाही, गिणत सुद्धा नाही अन् मरायलाही भीत नाही; मनोज जरांगे थेटच बोलले



लातूर : मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मी प्रयत्न करत असल्याने हे सरकार मला शत्रू समजत आहे. मी काहीही चुकीचे करत नाही. तरीही हे सरकार मला शत्रू समजत असेल, तर या सरकारला मी मोजत नाही, गिणत सुद्धा नाही अन् मरायलाही भीत नाही, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा सरकारवर तोफ डागली आहे. लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या मनोज जरांगे यांनी जाहीर सभेतून सरकराला हा इशारा दिला आहे.

यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, माझ्या समाजापेक्षा मला कोणीच मोठं नाही. मी माझ्या समाजाला मायबाप मानलं आहे. मी शेवटच्या टोकापर्यंत माझ्या समाजाच्या लेकरांसाठी संघर्ष करणार असून, मी काहीही चुकीचं करत नाही. सरकार मला शत्रू समजत आहे. मी काय चूक केली. गोरगरिबांच्या लेकरांसाठी न्याय मागितला, मराठ्यांचा मुलगा एका टक्क्याने हुकला तर घरी रडत येतो. आणि **। पान २ वर**




## जरांगेंनी लेकरु लेकरु म्हणून राजकीय ढेकरु देणं बंद करावं

### आमदार प्रसाद लाड यांचा जरांगे पाटलांवर निशाणा



मुंबई : जरांगे पाटील यांना सांगितलं होतं राजकीय भाष्य करु नका. देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करु नका. त्यामुळे त्यांनी लेकरु लेकरु करुन राजकीय ढेकरु देणं बंद करावं, असं म्हणत भाजपचे आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटलांवर निशाणा साधला. छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यातील शाब्दिक वाद अख्या महाराष्ट्राने पाहिला. पण आता जरांगे पाटलांनी त्यांचा मोर्चा फडणवीसांकडे वळवलाय. फडणवीसांनी विधीमंडळात अंतरवाली सराटीतील लाठीचार्ज प्रकरणी लेखी उत्तर दिलं आणि याच उत्तरामुळे जरांगेंनी फडणवीसांवर निषाणा साधला. त्यांच्या चालवित्या। **पान २ वर**




## लेखी आश्वासनानंतर रिपाईचे आमरण उपोषण स्थगिती




**उपोषणस्थळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे भेट**

उजनीचे पाणी अक्कलकोट व दक्षिण सोलापूर येथे येण्यासाठी पाठपुरावा चालू असून ३० डिसेंबरच्या आता पाणी येण्यासाठी प्रयत्नशिल आहे **–सचिन कल्याणशेट्टी, आमदार अक्कलकोट विधानसभा**


### ३० डिसेंबर पर्यंत पाणी सोडण्याचे अधिकाऱ्यांनी दिले आश्वासन

### अन्यथा संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आंदोलन : रिपाइं नेते प्रा.राहुल रूही

अक्कलकोट/प्रतिनिधीः उजनीच्या पाण्यासाठी गेली चार दिवस उपोषणकर्ते रिपाइं अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी आमरण उपोषणाला सुरुवात केले होते काल दिवसभर आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे मनसे तालुका उपाध्यक्ष श्रीकांत पाटील यासह विविध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी भेट दिले होते काल संध्याकाळी अधिकारी पाटणकर व नायब तहसीलदार पवार यांनी लेखी आश्र्वासन दिल्यामुळे उपोषण स्थगिती करीत असल्याचे माहिती तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी सांगितले

उजनीच्या पाण्यासाठी उपोषण करणाऱ्या उपोषणकर्ते रिपाइं अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या मागणीची तत्काळ दखल घेऊन कुरनुर धरणात पाणी सोडण्यात यावे अन्यथा संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल असे रिपाइं नेते प्रा.राहुल रूही यांनी एका पत्रकाद्वारे कळविले होते अक्कलकोट येथे तहसीलदार कार्यालयापुढे चालू असलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आमरण उपोषणाच्या ठिकाणी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी उपोषण कर्त्याची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केले व लवकरच पाणी येण्यासाठी पाठपुरावा चालू असल्याचे सांगितले

संपूर्ण अक्कलकोट तालुका हा दुष्काळग्रस्त असताना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झालेली असताना उजनी जलाशयातून अक्कलकोट तालक्याकरिता कुरनुर धरणात तत्काळ पाणी सोडण्यात यावे यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट तहसील कार्यालय येथे आमरण उपोषण सुरू असून आज उपोषणाचा चौथा दिवस असून उपोषणकर्ते अविनाश मडीखांबे यांची प्रकृती ढासळत चालली आहे तरी त्याच्या जीवितास काही झाल्यास होणाऱ्या परिणामाला प्रशासन जबाबदार असेल तत्काळ प्रशासनाने त्याच्या मागणीचा विचार करून उजनी जलाशयातून कुरनुर धरणात पाणी सोडण्यात यावे अन्यथा संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा



उजनीच्या पाण्यासाठी उपोषण करणाऱ्या उपोषणकर्ते रिपाइं अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांच्या मागणीची तत्काळ दखल घेऊन कुरनुर धरणात पाणी सोडण्यात आश्र्वासन अधिकारी दिल्यामुळे उपोषण स्थगिती करण्यात येत आहे ३०डिसेंबर पर्यंत पाणी न आल्यास संपूर्ण जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**– प्रा.राहुल रूही, रिपाइं नेते**

यावेळी रिपाइं नेते प्रा. राहुल रुही यांनी दिले होते पाण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे सर्व तालुकावासिय आभारी आहेत सर्वांना सर्वकाही माहिती आहे जनता दूधखुळी नाही त्यामुळे शेतकरी व जनता याच्या सहनशक्तीचा अंत आता पाहू नका आणि वेळकधुपणा न करता तत्काळ पाणी सोडण्यात यावे आणि तत्काळ उपोषणकर्ते अविनाश मडीखांबे यांचे उपोषण सोडणवण्यात यावे अशी मागणी यावेळी प्रशासनाला राहुल रुहि यांनी केली आहे.लेखी आश्र्वसनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

# संपादकीय

## पुन्हा जनता कसलीही ..

राज्यांतील निवडणुकांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. या निवडणुकीत भाजपने विरोधकांना पछाडले. याची राजकीय हिशेब मांडणी आणखी काही काळ सुरूच राहील. पण या निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांचा एक बदललेला पॅटर्न ठळकपणे समोर आला आहे, तो म्हणजे राजकीय पक्षांच्या आश्वासनांनी आता 'जुमला ते गॅरंटी' असे वळण घेतले आहे. 'गॅरंटी' हा शब्द काँग्रेसने कर्नाटकात प्रथम वापरला आणि तो यशस्वी झाल्यानंतर मोदींनी 'गॅरंटी' शब्दाचा वापर सुरू केला. 'ये मोदी की गॅरंटी है' असे वाक्य ते बहुतांश सभांमध्ये वापरताना दिसले. छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेशात भाजपने काँग्रेसचीच नक्कल करीत काही गॅरंटी मतदारांना दिल्या आहेत. गॅरंटी याचा सरळ अर्थ दिलेल्या आश्वासनांची शंभर टक्के अंमलबजावणी असा आहे. विरोधकांकडून मोदींनी दिलेल्या तोंडी गॅरंटीची खिल्ली उडवली जाण्याची शक्यता असल्याने यावेळी भाजपकडून मोदींच्या स्वाक्षरीनेच तेथील मतदारांना प्रथमच लिखित स्वरूपात ही गॅरंटी दिली गेली आहे. मोदींनी सन २०१४ आणि त्यानंतर २०१९ मध्ये मतदारांना जी जी आश्वासने दिली होती ती पूर्ण फोल ठरल्याचा अनुभव देशवासियांनी घेतला आहे. एक तर विदेशातून काळा पैसा परत आणून मतदारांना प्रत्येकी पंधरा-पंधरा लाख रुपये देण्याचे एक भ्रामक आश्वासन मोदींनी २०१४ च्या प्रचारसभांमध्ये दिले होते. ते खूपच गाजले होते. त्याची आतापर्यंत यथेच्छ खिल्ली उडवली गेली आहे. एका मुलाखतीत अमित शहांना पंधरा-पंधरा लाख रुपये मतदारांच्या खात्यांवर कधी येणार, असा थेट प्रश्न करण्यात आला होता. त्यावर अमित शहांनी हा एक इलेक्शन जुमला होता असे प्रांजळ उत्तर दिले होते. त्यामुळे भाजपच्या आश्वासनांचा उल्लेख जुमलेबाजांची आश्वासने असा केला जाऊ लागल्याने यावेळी मोदींनी आपली इलेक्शन स्ट्रॅटेजी बदलली आणि ते आता स्वतःच्या स्वाक्षरीने मतदारांना गॅरंटी देऊ लागले आहेत. या आधीची भाजप आणि मोदींची सारी आश्वासने हवेत विरून गेली आहेत. या पार्श्वभूमीवर आता लोकांना प्रत्यक्ष काही देण्याची वेळ आली आहे आणि त्याची लिखित गॅरंटी मोदी देणार असतील तर ती कोणाला नको आहे. निवडणुका जिंकण्याच्या नादात ज्या ज्या गॅरंटी मतदारांना दिल्या जाणार आहेत त्याची प्रभावी आणि थेट अंमलबजावणी व्हावी एवढीच अपेक्षा आहे. आता पुन्हा जनता कसलीही जुमलेबाजी सहन करण्याच्या मन:स्थितीत नाही.

# व्हाट्सएप युनिव्हर्सिटीचे विद्वान

सोशल मिडिया चा विकास विज्ञानामुळे झाला. आणि त्यामधून अज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करायला सुरवात झाली. कोणत्याही कुटुंबाची,व्यक्तीची व देशाची प्रगती शिक्षणावर व जागृतीवर अवलंबून असते. शिक्षण म्हणजे निव्वळ पदवी घेऊन कागद मिळवणे नव्हे तर शिक्षण म्हणजे वैचारिक बदल करून माणसाला माणूस म्हणून स्विकार करणे होय. शिक्षणाचा उपयोग स्वतः साठी कुटुंबासाठी तसेच देशासाठी होत असतो. शिक्षणामुळे माणूस जागृत होऊन सत्य असत्या मधला फरक कळून असत्याचा विरोध करून सत्याचा स्विकार कराण्याचे धाडस करणे म्हणजे शिक्षण होय. सत्य हे कटू असते आणि ते पचायला अवघड असते हे खुप वेळा आपण ऐकत असतो परंतु मागच्या काही वर्षापासून तर सत्य बोलणे गंभीर स्वरूपाचा गुन्हा झाल्याचे दिसून येते. सत्य बोलणाऱ्यांना देशद्रोही, धर्मद्रोही आणि व्यक्ती विरोधी म्हणून जाहीर केले जाते, किंबहुना अनेक प्रकरणात सत्य बोलले म्हणून पोलीस यंत्रणेचा गैरवापर करून दबावतंत्र वापरण्यात आले. चुकीचे, असत्य, काल्पनिक, माणसा माणसात द्वेष पसरवणे, विषमता, आणि ज्याचा व माणसाच्या विकासाचा कोणताही संबध नाही अशा पोस्ट, व्हिडीओ शेअर करण्यात धन्यता व विद्वता मानणारे विद्वान व्हाट्सएप युनिव्हर्सिटी ची देण आहे. या उलट आपण शिक्षीत असुन बेरोजगार आहोत, आपल्या सारखे अनेक तरुण शिक्षीत असुन बेरोजगार आहेत याची जाणीव नसुन केवळ चुकिच्या गोष्टींवर समोर येणारे आणि सत्य गोष्टीला विरोध करणारे विद्वान तरुण केवळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वरच आढळून येतात. देशात आरोग्य सुविधा मृत्युशयेवर आहेत, बेरोजगारी आहे, महागाई आहे, शिक्षणाचे व्यापारी करण करून बालवाडीची फी लाखों रुपयांपर्यंत गेली आहे. यावर एकही शब्द न बोलणारे किंबहुना या समस्या देशात आहेत याचीच जाणीव नसलेले आणि इतरांचा द्वेष करून माझाच धर्म, माझीच जात श्रेष्ठ कशी यावर गर्व करणारे तरुण निव्वळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून आपले मत बनवून मेंदु व शिक्षणाचा वापर करणे बंद केले आहे. चुकिची विचारसरणी व विशिष्ट समुहाचा द्वेष करून राजकीय झोळी भरून घेण्यासाठी या व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्वान तरुणांचा वापर जातीच्या, धर्माच्या व व्यक्तीच्या नावावर करून घेतला जातो. देशात हजारो वर्षांपासून विषमता, भेदभाव, अधंविश्र्वास व पाखंड याला खतपाणी घालून बहुसंख्य लोकांना मानसिक गुलाम बनवून स्वतः ची झोळी भरणारे लोक आजही आपला कावा सोडायला तयार नाहीत. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान यासारख्या गोष्टी असुनही जर बहुसंख्य तरुणांना अज्ञान, अंधविश्र्वास, पाखंड, भोंदुगीरी, काल्पनिक कथा, जात धर्म इत्यादी आधारावर माणसिक गुलाम बनवून माणसाला माणसा विरोधात, एका जातीला दुसऱ्या जाती विरोधात, एका धर्माला दुसऱ्या धर्माच्या विरोधात उभे करून तरुणांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आयुष्य उद्धस्त केले जात असताना ही व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे विद्वान विद्यार्थी सत्य बोलण्याची हिंमत करत नाहीत याचे कारण व्हाट्सएपच्या माध्यमातून चुकिचे, काल्पनिक व द्वेषाचे विचार आजही पेरून शिक्षणाला कमकुवत करून टाकले आहे. समाजामध्ये सामाजिक प्रबोधन करून लोकांना जागृत करणाऱ्या प्रत्येक संत महापुरुषांनी शिक्षणावर भर दिला, शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले परंतू व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्यार्थ्यांना संत महापुरुषांचे विचार व शिक्षण याचे काही घेणे देणे नाही. ते केवळ व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर विश्र्वास ठेवून स्वतः च्या समस्येकडे दुर्लक्ष करत, आपल्या बौद्धिक पातळीचा विचार न करता व्हाट्सएप वर आलेले मँसेज फॉरवर्ड करण्यात धन्यता मानतात. व्हाट्सएपवर बरेचसे मँसेज अशा पद्धतीने बनवले जातात की त्या मधुन चुकीच्या व काल्पनिक गोष्टी जास्त सांगितल्या जातात तसेच त्याच पोस्ट च्या माध्यमातून फॉरवर्ड करणाऱ्या तरुणांची बौद्धिक पातळी तपासली जाते. कारण चुकीचे काल्पनिक मँसेज केवळ जात धर्म किंवा इतरांचा द्वेष करण्यासाठी बनवले जातात. त्या मँसेज ची शहानिशा, सत्यता तपासून न बघता आला तसाच निव्वळ द्वेष भावनेने फॉरवर्ड करून आपली बौद्धिक क्षमता, बौद्धिक विकास हा मँसेज तयार करणाऱ्यांना दिसून येतो. आणि जे तरुण कोणत्याही प्रकारचा विचार न करता, सत्यता न तपासता, शहानिशा न करता जसाच तसा मँसेज फॉरवर्ड करतात तेच लोक समाजात द्वेष पसरवण्यासाठी वापरले जातात. व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर स्वतः ला विद्वान, अभ्यासक व शिक्षीत समजणारे परंतु समता बंधुता न्याय व स्वातंत्र्य, देशहित व मानव हीताचा विचार न करता निव्वळ एखाद्या गोष्टी चा विरोध करणारे लोक कधीच स्वतः बुद्धीने काम करत नाहीत. त्यांची बुद्धी दुसरे कोणी तरी कंट्रोल केलेली असते. ज्यांनी बुद्धी कंट्रोल केलेली असते त्याच लोकांना या मेंदु चा वापर न करणाऱ्या तरुणांचा जास्त वापर होतो. स्वतः बेरोजगार, औषधोपचार मिळत नसताना देशाच्या अर्थव्यवस्था व भारताचे नाव जगात झाले असा सिद्धांत मांडणारे तरुण बेरोजगारी, शिक्षण, महागाई आरोग्य सुविधा सारख्या समस्या ला सामोरे जातात. परंतु त्या विरोधात बोलु शकत नाहीत. कारण त्यांना जेथुन मँसेज येतात तेथे शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई, भोंदुगीरी, अंधविश्र्वास याबद्दल मँसेज येत नाही तर जाती जाती जाती धर्मात द्वेष व तिरस्कार करणाऱ्याच पोस्ट येतात म्हणून त्यांच्या डोक्यात निव्वळ द्वेषच भरण्याचे काम आज व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून बरेच लोक करत आहेत. म्हणून देशात अनेक समस्या निर्माण होऊनही त्यावर पाहिजे तशी चर्चा होत नाही परंतु ज्या गोष्टींवर चर्चा नको व्हायला त्या गोष्टींवर चर्चा मुद्दाम हुन केली जाते कारण या माध्यमातून चुकिच्या विचाराची पेरणी करून तरुण रोजगार, शिक्षण, आरोग्यासाठी नाही तर जात धर्मासाठी रस्त्यावर उतरले पाहिजे. हाच या मागचा उद्देश असतो. तरुणांनी आज आपला शत्रु ओळखून समान समस्येवर एकत्र येऊन शत्रु विरोधात आवाज उठवणे आवश्यक आहे. जाती धर्माच्या नावावर फुट पाडून जाती धर्माच्या नावावर झोळी भरणाऱ्या लोकांना धडा शिकवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कोणताही प्रकारचा भेद न पाळता सर्वांगीण विकासाची कास धरली तरच आपण स्वतः चा व देशाचा विचार करू शकतो. परंतु व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून चुकीचे विचार पेरून मुळ समस्येपासून दुर नेऊन निव्वळ काल्पनिक कथा, जात धर्म आणि द्वेष यांच्या नावावर लोकांना भावनिक बनवून त्यांना त्यांचा प्रचार प्रसार करायला लावणे व हे करताना तरुणांना धन्यता वाटतणे हेच व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर विद्वान असल्याचे लक्षण होय. जो तरुण आलेल्या पोस्ट ची शहानिशा करू शकत नाही, पोस्ट मधील तथ्य शोधु शकत नाही, त्यामागचा उद्देश शोधु शकत नाही अशा तरुणांच्या शिक्षणाचा उपयोग काय हा प्रश्र्न जरी उपस्थित राहीला तरीही शिकलेल्या, संख्येने जास्त असलेल्या लोकांना आजही मानसिक गुलाम बनवून, मुठभर लोकांचे चुकीचे पसरवण्यासाठी ढिगभर लोक समोर येऊन मोठ्या आनंदाने व गर्वाने काम करून धन्यता माणत असतील तर देश चुकिच्या दिशेने जात आहे. आणि व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून असेच विद्वान तरुण तयार झाले तर देशात विषमता, द्वेष, अज्ञान, माणसिक गुलाम जास्त वाढून देशात अराजकता माजेल परंतु आज आणि उद्याही व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्वान तरुणांना त्याच काही वाटणार नाही. कारण व्हाट्सएपच्या माध्यमातून चुकीचे घेतलेल्या ज्ञानाची शहानिशा न करता स्विकार करणे म्हणजे गुलाम असण्याचे सिद्ध करणे होय.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी

पण तरीही अनेक तालुक्यांचा या यादीमध्ये समावेश नाही, असं देखील विरोधकांचं म्हणणं आहे. दरम्यान अशा अनेक मुद्द्यावर विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे.

जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये राज्यात दिलासा देणारा पाऊस झाला नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत होता. त्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत देखील भर पडली. विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना पावासने अक्षरश: झोडपून काढलं. यामुळे कापूस, भात यांसारख्या अनेक पिकांना फटका बसला. त्यातच विमा कंपनींकडून देखील कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद येत नसल्याचा दावा शेतकऱ्यांकडून करण्यात येत होता. त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं.

## नमो महारोजगार मेळाव्यातील नोंदणी..

मेळावा यशस्वी ठरला आहे. मुलाखतीच्या माध्यमातून काही लोकांना प्रतिवर्ष १० लक्ष रुपयांचे पॅकेज मिळाले असून ही नमो महारोजगार मेळाव्याची फार मोठी उपलब्धी आहे. विशेष म्हणजे विविध कंपन्यामध्ये रोजगार मिळालेल्या ११०९७ उमेदवारांना नाविन्यपूर्ण कल्पनेतून एकाच क्लिकद्वारे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. पुढे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आजही उद्योगांना मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामुळे उद्योग कंपन्यांना मनुष्यबळ मिळवून देण्यासाठी शासन दुवा म्हणून काम करेल. दोन दिवसीय या मेळाव्यात कॉउंटर बंद झाल्यावरसुध्दा नोंदणी सुरूच होती. या नोंदणीच्या माध्यमातून कंपन्यांकडे उमेदवारांचा बायोडाटा जमा झाला आहे. त्यामुळे अशा उमेदवारांना बायोडाटाच्या आधारावर कंपन्यांमध्ये रोजगार मिळवून देण्यासाठी कौशल्य विकास विभागाने पाठपुरावा करावा. ज्यांना आज नियुक्तीपत्र मिळाले आहे, त्यांनी आपली गुणवत्ता सिध्द करून प्रमोशन घ्यावे, तर ज्यांना आजच्या मेळाव्यात नोकरी मिळाली नाही, अशा उमेदवारांसाठी शासनातर्फे आस्थापनांकडे पाठपुरावा सुरूच राहील, असेही श्री. फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी रिलायन्स, टाटा व अन्य काही आस्थापनांच्या सहभागासाठी सन्मान केला. नागपूरमध्ये मोठ्या संख्येने कंपन्या आल्याबद्दल आभार मानले.

**दोन दिवसांत इतिहास घडला : मंत्री लोढा**

नागपूर येथील नमो महारोजगार मेळावा हा सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाला असून मेळाव्यामध्ये सहभागी कंपन्या आणि मुलाखतीसाठी आलेल्या उमेदवारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता दोन दिवसांत एक नवीन इतिहास नागपूरने घडविला, असे गौरवोद्गार कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काढले.

**माझ्या पाच मुलांचा पगारच पाच कोटीपेक्षा अधिक !**

नमो रोजगार मेळाव्याच्या खर्चासंदर्भात काहींना प्रश्र्न पडला आहे. म्हणे, पाच कोटीपेक्षा अधिक खर्च लागला. आज या ठिकाणी आम्ही पाच उमेदवारांना सहा ते दहा लाखांपेक्षा अधिक पॅकेजचे नियुक्ती पत्र दिले. या माझ्या मुलांचा पगारच ५ वर्षात ५ कोटींपेक्षा अधिक होईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. नागपूरचा हा नमो रोजगार मेळाव्याचा प्रयोग यशस्वी झाला असून अन्य विभागात व जिल्ह्यातही हे मेळावे घेण्यात येईल.

**आस्थापना व बेरोजगारांसाठी मेळावे शासकीय प्लॅटफॉर्म**

शासकीय नोकऱ्या शासन देण्याचा प्रयत्न करते.त्याबद्दलची माहिती शासनाकडे असते. मात्र,खाजगी आस्थापना कंपन्यांकडे असणाऱ्या जागांची माहिती घेऊन बेरोजगारांना माहिती देणे व त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे यासाठी यापुढे रोजगार मेळावे होतील.कौशल्य विकास विभाग हा यासाठीचा प्लॅटफॉर्म बनून काम करेल , असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र हे स्टार्टअप कॅपीटल : स्टार्टअप सुरू करण्यात महाराष्ट्र अन्य राज्यांपेक्षा पुढे आहे. आऊटलूक कंपनीने केलेल्या सर्व्हेनुसार देशातील सर्वाधिक स्टार्टअप महाराष्ट्रात सुरू झाले असून महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप कॅपीटल आहे. विशेषत: ग्रामीण भागात नाविन्यपूर्ण, मार्केट लिंकेज देणारे स्टार्टअप देखील सुरू झाले आहे.

दोन दिवसात ३२८३१ मुलाखती : नमो महारोजगार मेळाव्यात एकूण ६७३७८ उमेदवारांची नोंदणी झाली. यात देशातील नामांकित ५५२ कंपन्यांनी सहभाग नोंदविला तर ३८५११ युवक-युवतींनी सहभाग घेतला. दोन दिवसात विविध कंपन्यांनी ३२८३१ मुलाखती घेतल्या असून यापैकी ११०९७ उमेदवारांनी रोजगार उपलब्ध झाला आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागाचे आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांनी केले. संचालन प्रांजली बारसकर यांनी तर आभार दिगांबर दळवी यांनी मानले.

## १७ महिन्यात १५६ कोटींचं अर्थसहाय्य

महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गोरगरीब – गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून अवघ्या १७ महिन्यात १९००० पेक्षा अधिक गोरगरीब –गरजू रुग्णांना एकूण १५६ कोटी ६० लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी दिली होती.

## सरकारला मोजत नाही, गिणत सुद्धा ..

हेच मी मांडत आहे. मराठा समाजाचे लोकं मोठ्या कष्टाने आपल्या लेकरांना शिकवायला लागले. पण, त्यांच्या मुलांना न्याय मिळत नाही. हीच मागणी मी मांडली आहे. आम्हाला आरक्षण होते, पण ते का दिलं नाही, हेच मी सरकारला विचारत आहे. माझ्या गोरगरीब मराठ्यांचे मुलं मोठे झाले पाहिजे यासाठी मी जीव हातावर घेऊन रात्र आणि दिवस फिरतोय. यात मी काय चुक केली. आणि तरीही तुम्ही मला शत्रू समजत असाल, तर मी सरकारला मोजत नाही, गिणत सुद्धा नाही अन् मरायला देखील भीत नाही, असे जरांगे म्हणाले.

पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की,माझ्या गोरगरीब मराठ्यांना आरक्षण पाहिजे. तोपर्यंत सरकारची सुट्टी नाही. तुम्ही कितीही टोळ्या निर्माण करा, त्याच टोळ्या उध्वस्त करण्याची ताकद माझ्या मराठा समाजाच्या मनगटात आहे. मराठ्यांना सहज समजू नका, मराठा शांत आहे, त्याला शांत राहू द्या, जास्त डिवचण्याचा प्रयत्न केल्यास होणारे आंदोलन तुम्हाला जड जाईल हे लक्षात ठेवा. कुऱ्हाडीची भाषा, कोयत्याची भाषा आम्हाला शिकवू नका. आमच्याही घरात काहीतरी आहे हे तुम्हाला माहित आहे. आमच्या नादाला लागू नका. मराठ्यांनो शांत रहा संयम ठेवा. मराठ्यांना शंभर टक्के आरक्षण मिळणार यात काहीही शंका नाही. फक्त आणखी काही जनजागृती करा, असे जरांगे म्हणाले.

उद्यापासूनच आंदोलनाच्या तयारीला लागा. मात्र आंदोलन शांततेत करायचा आहे. आता एकदा होऊ द्या, जे व्हायचं ते होईल. एवढ्या ताकतीने जनजागृती करा की, मराठा समाज आरक्षणापासून वंचित राहिला नको पाहिजे. पुढच्या काळात मराठा समाजाच्या लेकरांचं आरक्षणामुळे वाटोळं होता कामा नाही. जेवढ्या ताकतीने शेतात काम करतो, तेवढ्याच ताकतीने शांततेच्या आंदोलनात सहभाग नोंदवा. मराठ्यांच्या पदरात आरक्षण मिळाल्याशिवाय राहणार नाही, असेही जरांगे म्हणाले.

## नाशिक जिल्ह्यातील कांदा

काढण्यात आले असून, यामुळे शेतकरी आक्रमक झाल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. बीड , नाशिक , अहमदनगर जिल्ह्यात याचे सर्वाधिक परिणाम जाणवत असून, शेतकरी आक्रमक झाले. तर, काही ठिकाणी कांद्याचा लिलाव देखील बंद पाडण्यात आले.

केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी केल्यानं शेतकरी आणि व्यापारी दोघांमध्ये उद्रेक झाल्याचं पाहायला मिळालं. शुक्रवारी ठिक-ठिकाणी आंदोलनं झाल्यानंतर लिलाव बंद करण्याची हाक कांदा व्यापाऱ्यांनी दिली होती.त्यानंतर जिल्ह्यातील बाजार समितीत प्रतिसाद मिळाला. काही शेतकरी ६० ते ७० किलोमीटर अंतर पार करून चांदवड, पिंपळगाव बाजार समितीत जाऊन नाशिक बाजार समितीत पोहचले.

## जरांगेंनी लेकरु लेकरु म्हणून

धनीमुळेच त्यांचं आरक्षण गेलं. छगन भुजबळ ओबीसी भूमिका मांडत आहेत. राजकीय भूमिकेतून जरांगे आता महाराष्ट्राचे दौरे करत आहेत. त्यांच्याशिवाय कोणीच नाही हे दाखवण्याचा प्रयत्न करतायत.माझ्याकडे एक व्हिडिओ आहे. ज्यामध्ये त्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या डोक्यावर पगडी घातली आहे. आता हे शिवाजी महाराज यांच्यापेक्षा मोठे झाले का? असा सवाल प्रसाद लाड यांनी यावेळी उपस्थित केला. जरांगे हे अस्तित्वाची लढाई लढतायत, त्यामुळे ते फडणवीसांवर टीका करतायत. एकीकडे लेकरु आहे सांगायचं आणि दुसरीकडे दगडी मारायची, बंदूक ठेवायला लावयाची, अशी टीका प्रसाद लाड यांनी केलीये.

# कर्नाटकातील करजगी येथील हजरत ख्वाजा सैफुल मुलुक यांचे गंध मिरवणूक मोठ्या उत्साहात

अक्कलकोट/सोहेल फरास : कर्नाटकातील अफजलपूर तालुक्यातील करजगी येथीलगावचे पाटील यांच्या घरातून हैद्रा येथील हजरत ख्वाजा सैफुल मुलुख यांच्या उर्सात गंध(संदल) आणला जातो या गंध ची शानदार मिरवणूक मोठ्या उत्साहात करजगी येथे पार पडली. हैद्रा गावा पासून केवळ चार किलोमीटर अंतरावर असलेल्या कर्नाटकातील करजगी गावाचे पाटील यांच्या घरातून बैलगाडीवर परंपरागत पद्धतीने ग्रामदैवत व हिंदू-मुस्लीम एकतेचे प्रतिक असलेले हजरत ख्वाजा सैफुल मुलुख यांच्या यात्रेनिमित्त गंध (संदल) मिरवणूक मोठ्या उत्साहात व मोठ्या भक्ती भावात पारंपरिक वाद्यास मिरवणूक हैद्रा येथे पोहोचली यानंतर ही मिरवणूक गावातून निघून दर्गा येथे पोहोचली करजगी गावातील गावच्या पाटलांच्या घरातून हा गंध निघून हैदरा येथे पोहोचतो गावातील



प्रत्येक घरातील व्यक्ती हे गावातील असलेल्या दर्ग्यात दर्शन घेऊन संदल साठी गंध मिरवणुकीमध्ये सहभागी होतात. व या गंध मिरवणुकीत गावातील प्रत्येक समाजातील लहान मोठा व वयस्कर व्यक्ती या गंध मिरवणुकीसाठी गरजगी येथून हैद्रा येथे मोठ्या भक्ती भावाने चालत गंध घेऊन येतात गेल्या अनेक वर्षापासून ही परंपरा मोठ्या बंधू भावाने एकत्र येऊन गावातील लोक जपत आले आहेत लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या हैद्रा येथील हजरत खाजा सैफुल मुलुख बाबांचा ऊर्स शुक्रवार दिनांक ८ डिसेंबर पासुन सुरू असून तो तीन दिवस म्हणजे रविवार पर्यंत ऊर्स यात्रा चालतो.हजरत खाजा सैफुल मुलुख बाबा च्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने हैदराबाद येथे येत असतात तर अनेक लोक आपल्या अडीअडचणी आणि संकटे दूर व्हावी म्हणून हैदरा येथील दर्गाशरीफ येते एक दिवस दोन दिवस आठवडाभर वास्तव्य (मुकांम )करत असतात.

## पहिला टी २० सामना रद्द, नाणेफेकही झाली नाही

मुंबई : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या ढ२० मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. डर्बनमधील किंग्समीड येथे होणारा सामना पावसामुळे होऊ शकला नाही. दुपारपासूनच डर्बनमध्ये पावसाने हजेरी लावली. सततच्या पावसामुळे नाणेफेकही होऊ शकली नाही. त्यामुळे हवामान आणि मैदानाची स्थिती लक्षात घेऊन पंचांनी हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. पावसामुळे भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला टी २० सामना रद्द झाला. सततच्या पावसामुळे नाणेफेकही झाली नाही. हा सामना पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. पण पावसामुळे त्यांच्या पदरी निराशाच पडली. हजारो चाहत्यांना निराश होऊन घरी परतावे लागले. सामना सुरु व्हावा, त्यासाठी पंचांनी खूपवेळ वाट पाहिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# परिचारक यांच्या सहा वर्षांपूर्वीच्या मागणीला यश

## सर्व शासकीय कार्यालय येणार एकाच इमारतीत

पंढरपूर/प्रतिनिधी : तब्बल सहा वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पाठपुरावा केलेल्या शासकीय कार्यालय एकाच ठिकाणी करण्याच्या निर्णयाची मंजुरी मिळाली आहे

पंढरपूर हा सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाचा मोठा तालुका आहे श्री विठ्ठल रुक्मिणी च्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पंढरी नगरीत या राष्ट्रपती महोदय राज्यपाल महोदय मुख्यमंत्री महोदय असे अनेक व्ही व्ही आय पी मंडळी तसेच उच्चस्तरीय न्यायाधीश अधिकारी वर्ग नेहमीच येत असतात यामुळे येथे दोन अथवा तीन मजली विश्रामगृह असावे अशी मागणी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी केली होती. शहरात सर्व शासकीय कार्यालय कार्यालय एकाच इमारतीत असावी अशी मागणी अनेक वर्षापासूनची होती मध्यवर्ती प्रचासक भवानी होणे ही अतिशय शासनासाठी आवश्यक बाब होती तसेच यासाठी लागणारी जागा तहसील कार्यालय व सार्वजनिक बांधकाम उपविभागाची मिळून सुमारे पाच ते सहा एकर जागा मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध आहे यामध्ये ही इमारत होऊ शकते त्यानुसार त्यावेळी चे तत्कालीन मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मा.ना. श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब तत्कालीन सार्वजनिक बांधकाम व महसूल मंत्री तथा उच्च शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य मा.ना. चंद्रकांत दादा पाटील तत्कालीन नित्य आणि नियोजन तथा वनमंत्री मा.ना. श्री सुधीर भाऊ मुनगंटीवार साहेब यांच्याकडे गेले अनेक वर्षापासून सातत्याने माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पाठपुरावा करत होते पार चार परिचारक यांच्या पाठपुराव्यामुळे त्या अनुषंगाने सन २०१७. २०१८ मध्ये हा प्रस्ताव महासचिव यांच्याकडे प्राथमिक आराखडा तयार करून दाखल करण्यात आलेला होता.



सत्ता बदलल्यानंतर पुन्हा माझी आमदार प्रचारक यांनी या प्रस्तावाचा बाबत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्याकडे सर्व शासकीय कार्यालय एकाच ठिकाणी व्हावी यासाठी सतत पाठपुरावा करत होते याला यश आले असून लवकरच सदर काम सुरू होणार आहे यामुळे पंढरपुरातील नागरिका मध्ये समाधानाचे वातावरण आहे पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांच्या वतीने माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री एकनाथजी शिंदे साहेब व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे आभार व्यक्त केले

# मारा पुराचे ग्रामदैवत खंडोबा यात्रेस मोठ्या उत्साहात सुरुवात

पंढरपूर/प्रतिनिधीः रविवार दिनांक १० डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता धनगरी ओव्याचा कार्यक्रम तर मोहन यादव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार दिनांक ११ डिसेंबर रोजी सायंकाळी आठ वाजता जय हनुमान भजने मंडळ मारापूर यांच्या भजनाचा कार्यक्रम तर संतोष धनाजी यादव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे

मंगळवार दिनांक १२ डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता खुल्या डान्स स्पर्धा तर प्रभाकर यादव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे बुधवार १३ डिसेंबर रोजी रात्री आठ वाजता जादूगार शालीमार कोल्हापूर यांच्या जादूचा भरगोस कार्यक्रम तर प्रवर्ग प्रभाकर इंगोले यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले आहे

गुरुवार १४ डिसेंबर रोजी सायंकाळी आठ वाजता जय मल्हार यांच्या मुरळी तावशी यांच्या कार्यक्रम तर सुभाष यादव यांच्या वतीने महाप्रसादाचा आयन केले आहे शुक्रवार १५ डिसेंबर रोजी रात्री आठ वाजता भारुडाची ज्ञानोबा चौधरी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन. शनिवार दिनांक १६ डिसेंबर रोजी सायंकाळी दहा वाजता भेदिक गाण्याचा



कार्यक्रम जानकर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन १७ डिसेंबर रविवार रोजी अण्णासाहेब पाटील यांच्या वतीने महाप्रसाद त्याचबरोबर सायंकाळ साडेसात वाजता खंडोबा देवाचा छबिना सुरू होणार आहे व रात्री नऊ वाजता सा रे ग म आर्केस्ट्रा पार्टी कोल्हापूर यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सोमवार दिनांक १८ डिसेंबर रोजी सायंकाळी नैवेद्य तसेच ११ ते २ या वेळेत मुलांची रांगोळी स्पर्धा दुपारी तीन वाजता मैदानाचे आयोजन केले आहे

खंडोबा मंदिरात लाईट रोष नाही सुभाष यादव यांच्याकडे औषध अरुण आजबे यांनी त्यांच्याबरोबर छबिण्यात भंडाऱ्याचे उधळण संजय यादव यांच्या वतीने करण्यात येणार आहे खंडू मंदिरामध्ये हे सर्व कार्यक्रम होणार असून श्री खंडोबा देवस्थान यात्रा कमिटीचे सर्व पदाधिकारी व सदस्य यासाठी परिश्रम घेत आहेत

# केंद्रस्तरीय क्रीडास्पर्धेत लहान व मोठ्या गटात केंद्रशाळा हत्तीकणबसचे निर्विवाद वर्चस्व

अक्कलकोट/प्रतिनिधीः जि.प.सोलापूर शिक्षण विभाग पंचायत समिती अक्कलकोटमार्फत घेण्यात येणाऱ्या क्रीडास्पर्धेत केंद्रशाळा हत्तीकणबसने केंद्रस्तरीय क्रीडास्पर्धेत आपला दबदबा कायम राखला.



लहान गट कबड्डी मुले व मुली–विजेता
लहान गट खो-खो मुले व मुली– विजेता
लहान गट लंगडी मुले–विजेता
१०० मी धावणे लहान गट मुले
प्रथम–रामेश्वर सुरेश हिरापुरे
तृतीय– गणेश बिराजदार
१०० मी धावणे लहान गट मुली
द्वितीय– जान्हवी बिराजदार
तृतीय– सावित्री आंबेड
२०० मी धावणे लहान गट मुले
द्वितीय– रामेश्वर हिरापुरे
तृतीय– गणेश बिराजदार
लहान गट मुले बुद्धीबळ
प्रथम– रामेश्वर सुरेश हिरापुरे
लहान गट मुली बुद्धीबळ
प्रथम– श्रवेता पंचाप्या स्वामी
मोठा गट खोखो मुले व मुली-विजेता
मोठा गट कबड्डी मुली-विजेता
मोठा गट लंगडी मुले-विजेता
मोठा गट लंगडी मुली-उपविजेता
१०० मी व धावणे मोठा गट मुले
प्रथम–महादेव कल्याणी बिराजदार
द्वितीय–शंकर सुरेश हिरापुरे
२०० मी धावणे मोठा गट मुले
द्वितीय–महादेव कल्याणी बिराजदार
१०० मी धावणे मोठा गट मुली
प्रथम–नंदिनी शरणाप्पा जमादार
द्वितीय– साक्षी श्रीशैल नंदगाव
२०० मी धावणे मोठा गट मुली
प्रथम–नंदिनी शनाप्पा जमादार
द्वितीय–साक्षी श्रीशैल नंदगाव
बुद्धिबळ मोठा गट मुले
प्रथम–अजित अनिल धनाळे
बुद्धिबळ मोठा गट मुली
प्रथम–अस्मिता अनिल धनाळे

सर्व विजयी खेळाडूचे केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगारसाहेब,हत्तीकणबस शा.व्य.स.चे अध्यक्ष देवेंद्र बिराजदार,उपाध्यक्ष पंचाप्पा घोडके, सरपंच श्रीशैल माळी, उपसरपंच म्हेत्रे,पोलिस पाटील,तंटामुक्त समिती अध्यक्ष व पालकांनी अभिनंदन केले व बिटस्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक इस्माईल मुर्डी,विक्रम जाधव,अरुण पांचाळ,राजाराम सुरवसे,शीतल डावरे,शिवानंद मंगरूळे,उषा गायकवाड व बबिता कोरेकर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# विकसित भारत संकल्प यात्रेचे वागदरी येथे उस्फुर्त स्वागत



वागदरी/एस.के.गायकवाड : विकसित भारत संकल्प यात्रेचे वागदरी ता.तुळजापूर येथे आगमन होताच ग्रामस्थांच्या वतीने उस्फुर्त पणे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारने राबविलेल्या आणि राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आयुष्मान भारत योजनेचे कार्ड वाटप करण्यात आले.यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस अँड, दिपक दादा अलुरे,भाजपा इटकळ गट प्रमुख आरविंद पाटील, विवेकानंद मिलगीरे,भिवा इंगोले,प.स.विस्तार अधिकारी ए.सी.कावळे, डॉ. यशवंत नरवडे,आरोग्य सेवक आर.बी.गोबाळे,आर.बी. हावलदार आदींनी शासनाच्या विविध योजना बाबत उपस्थित ग्रामस्थांशी चर्चा केली.या प्रसंगी सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर,उपसरपंच मिनाक्षी बिराजदार, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार,अंकोल वाघमारे, मुक्ताबाई बिराजदार, सुरेखा यादव,जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर,सहशिक्षक तानाजी लोहार, किशोर धुमाळ,रामसिंग परिहार, आशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार,सिआरपी विद्या बिराजदार,कोमल झेंडारे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुक्यात आढळल्या कुणबी मराठाच्या ४२ नोंदी

अक्कलकोट/प्रतिनिधीः तालुक्यात कुणबी मराठा शोधमोहिमेत आतापर्यंत ४२ नोंदी आढळल्याने कुणबी नोंदी शोधमोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे या कुणबी नोंदी लिंगायतबहुल गावात मिळाल्या आहेत. तालुक्यात ३ लाख १६ हजार ७५७ अभिलेख तपासण्यात आले. यापैकी केवळ बारा गावांमध्ये कुणबी नोंदी आढळल्याचे स्पष्ट झाले आहे. तालुक्यातील दोड्याळ (१), करजगी(२), शिरवळ (९), तडवळ(४), कल्लकर्जाळ(१), मुंडेवाडी (२), दहिटणे (१२), बणजगोळ (३), सलगर (१),हत्तीकणबस (३), मोट्याळ (३), हन्नूर (१) या बारा गावांचा समावेश आहे.

यात ४२ नोंदी आढळून आल्या असून यातील बहुसंख्य गावे ही लिंगायतबहुल आहेत. शहरातदेखील एकही कुणबी नोंद आढळून आली नाही. मराठाबहुल गावांमध्ये कुणबी नोंदी आढळल्या नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. कुरनूर, चुंगी, सिंदखेड, बोरगाव, गोगाव, मराठवाडी, दहिटणेवाडी, सांगवी, शावळ, पानमंगरूळ, किणी, किणीवाडी, आंदेवाडी, बागेहळ्ळी, बावकरवाडी, काळेगाव, वागदरी, सुलतानपूर, चपळगाव, डोंबरजवळगे, धुंगेगाव, नाविंदगी, मिरजगी, बोरोटी, संगोगी, उडगी, जेऊर, घोळसगावसह ३५ गावांत कमी-जास्त प्रमाणात मराठा समाज आहे. तरीदेखील कुणबी नोंदी आढळल्या नसल्याचे समजते. वास्तविक पाहाता शासनाने आदेश दिले होते. मात्र, तहसील कार्यालय उत्तर पोलीस ठाणे आणि काही कार्यालय वगळता बहुसंख्य ठिकाणी शोधमोहीम केवळ कागदावरच राबविण्यात येत असल्याची चर्चा आहे.

# बार्टीने विविध उपक्रम राबवून महामानवास केले अभिवादन

मुंबई : डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक मा सुनिल वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभर विविध उपक्रम राबवून महापरिनिर्वाणदिनी महामानवास विनम्र अभिवादन करण्यात आले.

चैत्यभूमी, दादर, मुंबई येथील स्मारकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस समाज कल्याणचे सहसचिव दिनेश डिंगळे, बार्टीचे महासंचालक मा सुनिल वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण, प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी अभिवादन केले.

शिवाजी पार्क दादर येथील मैदानात बार्टीतर्फे ८५ टक्के सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, भारताचे संविधान, बुद्ध आणि त्यांचा धम्म व इतर पुस्तके अनुयायांकरिता जवळपास मूळ किंमतीच्या अकरा लक्ष रुपयांची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती.

पुस्तक स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून तसेच अनुयायांना पुस्तकांचा संच उपलब्ध करून देऊन करण्यात आले.




देशभरातून आलेल्या अनुयायी तथा भीमसैनिक, शासकीय अधिकारी या सर्वांनी अत्यंत शिस्तबद्धपणे शांतता पुर्वक रांगेत उभे राहून बार्टीच्या पुस्तक स्टॉलवर पुस्तके खरेदी केली. बार्टीच्या सर्व सुरक्षारक्षकांनी मनोज पवार यांच्या सूचनांचे पालन करत गर्दी होऊन कोणालाही त्रास होऊ नये याकारिता नियोजन व्यवस्थित केले.

बार्टीच्या वतिने महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२३ रोजी भोजन वाटप करण्यात आले यांचा ५० हजार अनुयायांनी लाभ घेतला.

अनुयायींना पुस्तके कमी पडू नयेत यासाठी बार्टीचे महासंचालक मा. वारे, विभागप्रमुख डॉ चव्हाण यांनी तसे आदेश बार्टीतील अधिकाऱ्यांना दिले होते. बार्टीच्या या उपक्रमाचे देशभरातून आलेल्या पुस्तक प्रेमी नागरिकांनी व भीमसैनिकांनी कौतुक करून बार्टीचे अभिनंदन केले. बार्टी मार्फत श्री विष्णू शिंदे यांनी घाटकोपर येथे व श्री अशोक गायकवाड यांनी पुणे स्टेशन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा या ठिकाणी अनुक्रमे भीम गिते व भीम गझलांचा कार्यक्रम केला.

चैत्यभूमी, मुंबई या ठिकाणी नियोजनाकरिता प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, डॉ प्रेम हनवते, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक नसरिन तांबोळी, डॉ संभाजी बिराजे, प्रकल्प अधिकारी मेघा पवार, सचिन नांदेडकर, सुनंदाताई गायकवाड, रामदास लोखंडे, उषा भिंगारे यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आ.प्रणिती शिंदे यांना खासदार करण्याचा संकल्प

सोलापूर/प्रतिनिधीः आमदार प्रणिती शिंदे यांना आगामी लोकसभा निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून आणून त्यांना खासदार करण्याचा संकल्प काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला. काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी व आमदार प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने काँग्रेस भवन येथे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते केक कापण्यात आला. तसेच चेतन नरोटे यांच्या अध्यक्षपदाच्या वर्षपूर्तीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत एक दिलाने काम करून आमदार प्रणिती शिंदे यांना बहुमताने निवडून आणण्याचा चंग बांधला. यावेळी बोलताना नरोटे म्हणाले की, सुशीलकुमार शिंदे यांच्यानंतर त्यांचा वारसा समर्थपणे प्रणितीताई चालवतील हे सोनिया गांधी यांना दाखवून देऊ, भाजप सरकारच्या भूलथापांना सडेतोड उत्तर देण्यासाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने पक्षाचा प्रचार करावा. तसेच माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळाला एक वर्ष पूर्ण झाला असून या वर्षभरात येणाऱ्या



प्रत्येकाचे काम करण्याच्या प्रयत्न केला. अध्यक्षपदी असताना चांगले काम केलेल्या धर्मा भोसले यांचे नाव आजही घेतले जाते. माझ्याशह आपल्या सर्वांची जबाबदारी आहे की, आगामी लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेसचा विजयी झेंडा फडकाविण्याचा आजच्या दिवशी संकल्प करू या, असेही ते म्हणाले. यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, विनोद भोसले, शहर कार्याध्यक्ष मनोज यलगुलवार, फिरदोस पटेल, सेवादलाचे अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, सुशील बंदपट्टे, किसन मेकाले, तिरुपती परकीपंडला, शौकत पठाण, एन. के. क्षीरसागर, मधुकर आठवले, दीनानाथ शेळके, हेमा चिंचोलकर, यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सैनिक टाकळी चे रमेश श्रीपती पाटील यांची भाजपा कोल्हापूर जिल्हा पूर्वचे माजी सैनिक अध्यक्षपदी निवड



सैनिक टाकळी/प्रतिनिधी : सैनिक टाकळी येथील भारतीय जनता पार्टी कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पुर्वच्या माजी सैनिक सेल जिल्हा संयोजक (अध्यक्ष) पदी श्री. रमेश श्रीपती पाटील (माजी सुभेदार) यांच्या निवडीचे पत्र देते वेळी माजी आमदार श्री. अमोल महाडिक सौ .जिल्हा अध्यक्ष श्री. राजवर्धन निंबाळकर. जिल्हा उपाध्यक्ष श्री. हरिश्चंद्र पाटील (भाऊ) सरचिटणीस विठ्ठल पाटील शहाजी भोसले .अविनाश मगदूम. कृष्णात आंबी. उपस्थित होते

# सैनिक टाकळीतील विविध विकास कामासाठी अनुदान मिळवण्यासाठी निवेदन




सैनिक टाकळी/संजय चव्हाणः येथील विविध विकास कामासाठी माजी सैनिकांच्या घर फाळा माफीसाठी ठोस अनुदान माननीय श्री. असन मुश्रीफ सौ .यांना अनुदान मिळण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी माझी डेपोटी सरपंच. संतोष गायकवाड. श्रीधर भोसले. शेखर पाटील. वाल्मीक कोळी. यांच्या हस्ते देण्यात आले. सैनिक टाकळी गावचे माजी डेप्युटी सरपंच संतोष गायकवाड व श्रीधर भोसले यांनी सैनिकी परंपरा असलेल्या गावासाठी माजी सैनिकांचा घरफाळा माफ व्हावा किंवा अनुदान मिळावे याबद्दल निवेदन दिले. तसेच गावातील विविध विकास कामे खेचून आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केले आहेत. त्याबद्दल त्यांचे सैनिक टाकळी मध्ये कौतुक होत आहे.

# आ.आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत हात व पाय शिबिरासाठी लाभार्थींचा मोठा प्रतिसाद




पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमदार समाधान आवताडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून साधू वासवानी पुणे यांच्या सहकार्याने पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत कृत्रिम हात व पाय शिबिरासाठी मतदारसंघातील लाभार्थ्यांनि मोठा प्रतिसाद नोंदवला आहे

याशिबिराचे उद्घाटन पंढरपूर प्रांत अधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सोमनाथ अवताडे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले

या शिबिरामध्ये जवळपास ३८४ इतका लाभार्थींनी आपल्या अवयवाची तपासणी करून आवश्यक अवयवासाठी मोजमाप व संबंधित संस्थेकडे दिले आहे यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी सांगितले की आमदार समाधान आवताडे यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या मंडळींनी त्यांच्या वाढदिवसावर अनाथ सेवक खर्च न करता लाभार्थी बंधू भगिनींसाठी आपल्या संवेदनशील भावनेने या शिबिराचे आयोजन करून आमदार अवताडे यांना ही गागळ्यावेगळ्या पद्धतीने शुभेच्छा देण्याचा मानस ठेवला आणि त्यांनी या उपक्रमातून तो पूर्ण केला आहे

समाजातील अशा घटकांना जगण्याची उमेद निर्माण करून देण्यासाठी अशा विधायक उपक्रमाचे नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले

या कार्यक्रमासाठी माजी उपसभापती विजयसिंह देशमुख विठ्ठल कारखान्याचे माजी संचालक द्रोणाचार्य हाके माजी नगरसेवक सुनील राज डोंबे माजी नगरसेवक डी राज सर्व गोड मोहन बागल संतोष पवार राजेंद्र हुंडेकरी संदीप माने मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण शांतिनाथ बागल दत्तात्रय कोळेकर शरीफ भाई शेख नाना हाके विनोद राज लटके बापूसाहेब कदम प्रसाद कळसे बाळासाहेब खपाने समाधान देठे धनाजी जाधव शहाजी कांबळे गोवर्धन थेटे भाऊ भोसले पांडुरंग शिंदे तुकाराम कुरे दत्ता रोंगे पाटील तात्या जगताप पांडुरंग करमरकर धीरज मामाने पिराजी धोत्रे अमोल धोत्रे सुनील खटावकर सतीश गांडुळे दीपक येळे भास्कर घायाळ अनिकेत देशमुख संदीप पाटील शब्बीर इनामदार शेखर भोसले संतोष डोंगरे पांडुरंग वाडेकर राहुल गावडे भाऊसाहेब शिंदे नाईक समाधान घड्याळ गोडसे हनुमान ताटे महेश चव्हाण संजय माळी भीमा भोसले परमेश्र्वर पाटील किसन पवार दादा मोरे अंतिम मुलानी दत्ता शिंदे उमेश वाघमारे अभिजीत माने नितीन धोत्रे प्राजक्ताबाई येणारे जयश्री क्षीरसागर ज्योती कुलकर्णी आदित्य मान्यवर लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

आमदार आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया रक्तदान शिबिर वृक्षरोपण मोफत नेत्र तपासणी मतदारसंघातील पशूंची आरोग्य तपासणी गरजूंना ब्लँकेट वाटप विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप विद्यार्थ्यांमध्ये मुद्दाम मातापित्यांना भोजन व फळे वाटप गोपाळनाथ गोशाळा व कोल्हापुरी ते गाईंना चारा वाटप यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

# अभिजीत पाटील युवा संघर्ष यात्रेत नागपूर येथे झाले सहभागी



पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादीचे नेते व श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील हे आज दि.१० डिसेंबर रोजी नागपूर येथे युवांच्या उज्ज्वल भविष्यासाठी काढलेल्या युवा संघर्ष पदयात्रेत कर्जत जामखेडचे आमदार रोहित दादा पवार, रोहित आर.आर.पाटील यांच्यसोबत सहभागी झाले असून दि.१२ डिसेंबर रोजी झीरो माईल, नागपूर येथे देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब तसेच शिवसेनेचे नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेसचे नेते दिग्विजय सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये युवा संघर्ष यात्रेचे सांगता समारोप होणार असल्याचे श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले.

१२ डिसेंबर रोजी देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांचा वाढदिवस असून देखील युवांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी ८३ वर्षाचा योद्धा थेट नागपूर येथे युवांचा आवाज उठवण्यासाठी येत आहेत.झिरो माईल नागपूर येथे दुपारी ठीक २ वाजता देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब, शिवसेना (ठाकरे गट) नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे नेते दिग्विजय सिंह यांच्या उपस्थितीमध्ये भव्य विराट सांगता सभा होणार असल्याचे सांगितले. तेथील सर्व नियोजन चेअरमन अभिजीत पाटील यांच्या खांद्यावर असल्याने पाटील दोन दिवस अगोदरच नागपूर येथे दाखल झाले आहेत.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गीर अभयारण्यात केली लायन सफारी

मुंबई : गुजरातमधील जगप्रसिध्द सोमनाथ जवळील जुनागड जिल्हयातील गीर सासन अभयारण्यात आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी कुटुंबियांसोबत भेट दिली. भारतीय सिंहासाठी सुप्रसिध्द असणारे गीर सासन अभयारण्य हे देशातील मोठे प्रमुख आणि प्रचंड विस्तार असणारे अभयारण्य आहे. या अभयारण्यात आज ना. रामदास आठवले यांनी कुटुंबियासह लायन सफारी करुन वनराज सिंहाना पाहण्याचा आनंद घेतला.



रिपब्लिकन चळवळीचे पँथर ना.रामदास आठवले आणि गीर सासन अभयारण्यातील सिंहाची आज भेट झाली. महाराष्ट्रातुन आलेल्या रामदास आठवले या पँथरचे स्वागत गीर सासनच्या जंगलात येथील सिंहांनी त्यांच्या गाडीसमोर उभे राहुन केले. ना.रामदास आठवले या पँथरच्या नजरेला नजर देवुन गीर सासन अभयारण्यातील रस्त्यावर दोन सिंह उभे राहिले. एक सिंह पँथर रामदास आठवलेंच्या गाडीजवळ येवून बाजुने शांतपणे गेला. दुसरा सिंह गाडीसमोर रस्त्यावर लोळत होता.

सिंहाना बघुन मागे परतत असतांना रस्त्यात लोळत असलेला सिंह पुन्हा उठुन पँथर रामदास आठवले यांच्याकडे शांतपणे येत गाडीच्या बाजुने निघुन गेला. पँथर रामदास आठवले आणि गीर मधील सिंहाची भेट पाहण्याचा थरार अनुभव ना. रामदास आठवले यांच्या पत्नी सौ.सिमाताई आठवले, पुत्र जित आठवले, आणि आठवले कुटूंबिय तसेच रिपाइंचे गुजरात राज्य अध्यक्ष अशोककुमार भट्टी, गुजरात रिपाइंचे प्रभारी जतीन भुट्टा यांनी अनुभवला.

गीर सासन अभयारण्य हे १४०० किलोमिटरचे नॅशनल पार्क आहे. येथील सिंहाचे मुख्य खाद्य हे हरिण आहेत.

ययेथे हजारोंच्या संख्येने हरिण आहेत. येथे पाण्याचे ओढे आहेत. तसेच ३६ बोरींग खोदण्यात आलेल्या आहेत. त्याद्वारे सिंहाना पाणी दिले जाते. येथील हरणांची शिकार सिंह एकत्र येवुन करतात. हरिण हे अत्यंत चपळ असल्याने दोन सिंह एकत्र येवून त्यांची शिकार करीत असतात. सिंहामधील हे सामजंस्य चकित करणारे असल्याची माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

# गोटेवाडी येथे खासदार जयसिद्धेश्वर स्वामी यांच्या हस्ते केंद्रीय योजनांच्या जनजागृती पर चित्ररथाचे उद्घाटन




सोलापूर/प्रतिनिधीः विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातील अनेक जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विविध केंद्रीय योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. सोलापूर जिल्ह्यातील या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केंद्रीय योजनांच्या प्रचार व प्रसार करणाऱ्या मोबाईल व्हॅन द्वारे करण्यात आलेले होते. गोटेवाडी ता. मोहोळ येथील कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार जय सिद्धेश्र्वर स्वामी महाराज यांनी केले.यावेळी माजी पालकमंत्री तथा आमदार विजयकुमार देशमुख, तहसीलदार मुळीक, गटविकास अधिकारी आनंद मिरगणे यांच्यासह गोटेवाडी चे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी गोटेवाडी ता. मोहोळ येथे खासदार जयसिद्धेश्वर स्वामी महाराज यांच्या हस्ते केंद्रीय योजनांची माहिती देणाऱ्या चित्ररथाचे उद्घाटन फित कापून करण्यात आले. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता माननीय प्रधानमंत्री महोदय यात्रे अंतर्गत देशभरातील विविध लाभार्थ्यांची संवाद साधणार होते, या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण चित्ररथाच्या द्वारे गावोगावी करण्यात आलेले होते. गोटेवाडी येथील कार्यक्रमास खासदार जयसिद्धेश्र्वर स्वामी यांचीही उपस्थिती होती. तर गावातील शेकडो नागरिकांनी हे थेट प्रक्षेपण पाहिले तसेच केंद्रीय योजनांची माहिती जाणून घेतली.

दहिटणे येथील विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची उपस्थिती होती. यावेळी दहिटणे येथील ग्रामस्थांना केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांच्या नावांची नोंदणी करण्यात आली. तसेच सोलापूर महापालिकेच्या वतीने शहरातील सात रस्ता चौकात माननीय प्रधानमंत्री महोदय यांचा लाईव्ह कार्यक्रम लाभार्थ्यांना दाखवण्यात आला. यावेळी लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*** मोहिमेचे योग्य नियोजन व लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद** : शहर व ग्रामस्तरावर विविध योजनांची परिपूर्णता साधण्यासाठी या यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. ही मोहीम सोलापूर जिल्ह्यात २६ जानेवारी २०२४ पर्यंत चालू राहणार आहे. यासाठी आठ वाहने केंद्र शासनाने परिपूर्ण उपलब्ध करून दिली आहेत. या मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हळे यांनी वेळोवेळी मीटिंग घेऊन मार्गदर्शन केलेले आहे. सोलापूर महापालिका हद्दीत महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम सुरू आहे. ग्रामीण व शहरी भागात लाभार्थ्यांकडून केंद्रीय योजनांचा लाभ घेण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

*** उद्देश** : केंद्र शासनाच्या विविध योजनांसाठी पात्र असलेल्या परंतु अद्यापी लाभ न घेतलेल्या लाभार्थ्यापर्यंत ही योजना पोहोचण्यात येणार आहे. संभाव्य लाभार्थ्याची नोंदणी करणे नागरिकांशी वैयक्तिकचित्रफितीद्वारे संवाद साधून त्यांना योजनेबद्दल माहिती देणे व तेथेच प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे या मोहिमेचा उद्देश आहे. विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांनी आपला अनुभव देखील व्हिडिओच्या माध्यमातून शेअर केले जात आहेत. जेणेकरून इतरांनाही त्यापासून प्रेरणा मिळत आहे. तसेच नागरिकांना शासकीय योजनांची माहितीसाठी जिल्हा ते गाव गावपातळीवरती चित्रकथाद्वारे जिंगलस, पोस्टर्स छायाचित्र, ध्वनी चित्रफीत आदी माध्यमातून प्रत्यक्ष प्रसिद्धी करण्यात येत आहे. जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागातील एकही लाभार्थी केंद्र शासनाच्या योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सूक्ष्मपणे नियोजन केले आहे. व गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला जात आहे.

*** केंद्र शासनाच्या योजना** : केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या आयुष्मान भारत, पीएम गरीब कल्याण योजना, दीनदयाल अंतोदय योजना, पंतप्रधान आवास योजना, पीएम उज्वला योजना, पीएम किसान सन्मान योजना,पोषण अभियान, जल जीवन मिशन,खेड्यात सुधारित तंत्रज्ञान सह मॅपिंग, जनधन योजना, जीवन ज्योती विमा योजना, पीएम सुरक्षा विमा योजना , अटल पेन्शन योजना आदि.

***२० हजार लाभार्थ्यांची उपस्थिती** : या संकल्प यात्रे अंतर्गत ग्रामीण भागातील ११ तालुक्यांपैकी सांगोला व उत्तर सोलापूर तालुक्यासाठी केंद्रीय योजनांची जनजागृती वाहन मिळालेले नाही. उर्वरित ९ तालुक्यात आत्तापर्यंत २० हजार लाभार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावलेली असून सुमारे १३ हजार ५० नागरिकांनी शपथ घेतलेली आहे. या ९ तालुक्यात दिनांक २६ जानेवारी २०२४ पर्यंत या कार्यक्रमाची प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे.

*** जिल्ह्यात ८ चित्र रथाद्वारे जनजागृती** : विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील नागरिकापर्यंत केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती पोहोचवून योजनांचा प्रसार करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी आठ चित्ररथ देण्यात आलेले असून याद्वारे जिल्ह्यातील १ हजार १९ ग्रामपंचायती व महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतीच्या प्रत्येक वार्ड मध्ये चित्ररथ पोहोचून केंद्रीय योजनांची माहिती दिली जाणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत तालुका निहाय नियोजन करण्यात आलेले आहे तर शहरी भागात चित्ररथ प्रत्येक वार्डापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा नगरपालिका प्रशासन यांच्यामार्फत नियोजन करण्यात आलेले आहे.

# ‘महापुरुषांचे कौशल्य विचार’ पुस्तक प्रकाशन आणि स्वर्गीय दत्ताजी डिडोळकर पुरस्कार वितरण सोहळ्याचे राजभवन नागपूर येथे १२ डिसेंबरला आयोजन : मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ‘महापुरुषांचे कौशल्य विचार’ या पुस्तकाचे प्रकाशन आणि स्वर्गीय दत्ताजी डिडोळकर सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्याचे नागपूर येथे १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.०० वाजता राजभवन नागपूर येथे आयोजन केले आहे. राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, महाराष्ट्र हा आपल्या महापुरुषांच्या कर्तृत्वाने, प्रेरणेने आणि विचारान समृध्द आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा जोतीराव फुले, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक,स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर या महापुरुषांच्या कौशल्य विषयक अप्रतिम ध्येय धोरणाची ओळख व महात्म्य आजच्या विशेषतः कौशल्य शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीला होणे गरजेचे आहे.या महापुरुषांनी आपल्या काळात समाज जीवनामध्ये कौशल्य विकासाचे तत्त्व यशस्वीपणे अंगिकारले होते.महापुरुषांचे कौशल्य विचार या पुस्तकात महापुरुषांच्या कौशल्य विषयक कार्याचा, धोरणाचा व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमांमध्ये समावेश केल्यामुळे व्यवसाय शिक्षण अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढण्यासही मदत होणार आहे. आयटीआयच्या सद्यस्थितीतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त महापुरुषांचे कौशल्य विचार हा विषय विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय स्तरावर गठीत समितीने तयार केलेल्या या माहितीपूर्ण पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे असेही मंत्री श्री. लोढा म्हणाले.

मंत्री श्री. लोढा म्हणाले की, बहुआयामी व्यक्तीमत्व स्वर्गीय दत्ताजी डिडोळकर यांच्या नावाने शैक्षणिक, सामाजिक आणि कौशल्य विकास क्षेत्रात भरीव योगदान देणा-या व्यक्तींना स्वर्गीय दत्ताजी डिडोळकर सन्मान पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.या कार्यक्रमाला स्थानिक लोकप्रतिनिधी, कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह,महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे आयुक्त डॉ.रामास्वामी एन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगांबर दळवी, कौशल्य



विद्यापीठाच्या कुलगुरू अपूर्वा पालकर,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबईचे उप आयुक्त दि.दे.पवार यासह आणि अधिकारी उपस्थित राहणार आहेत तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात आले आहे.